# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,

## मुंबई विभागीय मंडळ, वाशी, नवी मुंबई - ४०० ७०३.


---

## अतिमहत्वाचे

**परिपत्रक क्र.मुंविमं/संशोधन/सन२०२२-२३/इ.१०वी व इ.१२वी/ १४५० दि. १९/०७/२०२२**

**विषय :** शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून इ.१ली ते इ.१२वी चा पाठ्यक्रम १००% राबविणेबाबत...

**संदर्भ** : १.शासन निर्णय क्र. अभ्यास-२०२२/प्र.क्र.१०४/एसडी-४, दि.२४/०६/२०२२

२.राज्य मंडळ पत्र क्र.रा.मं/परीक्षा-२/३१९२, दि.०१/०७/२०२२

या परिपत्रकाद्वारे मुंबई विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालयांचे प्राचार्य व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक यांना कळविण्यात येते की, मार्च २०२० पासून कोविड-१९ च्या पादुर्भावामुळे निर्माण झालेल्या आपत्कालीन परिस्थितीमध्ये शाळा ऑनलाईन स्वरूपामध्ये सुरू होत्या. तसेच प्रत्यक्ष शाळेत अध्ययन-अध्यापन मर्यादित स्वरूपात होत असल्याने कालावधीमध्ये विद्यार्थ्यांवरील अध्ययनाचा ताण कमी व्हावा या दृष्टीने शैक्षणिक वर्ष सन २०२०-२१ व २०२१-२२ या शैक्षणिक वर्षासाठी इयत्ता १ ली ते १२ वी चा पाठ्यक्रम २५% कमी करण्यात आला होता.

**संदर्भिय शासन निर्णय क्रमांक अभ्यास-२०२२/प्र.क्र.१०४/एसडी-४ दिनांक २४ जून, २०२२ अन्वये शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून इयत्ता १ ली ते १२ वी साठी १००% पाठ्यक्रम लागू करण्यास शासनाची मान्यता देण्यात आलेली असल्याने शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षा १००% अभ्यासक्रमानुसार घेण्यात येणार आहे.**

उपरोक्त बाब आपल्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी, त्यांचे पालक व शिक्षक यांच्या त्वरित निदर्शनास आणून शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाच्या दर्शनीय फलकावर सूचना लावण्यात यावी. जेणेकरून विद्यार्थी, पालक व शिक्षक उपरोक्त माहितीपासून वंचित राहणार नाही.

(डॉ.सुभाष बोरसे)
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळ
वाशी, नवी मुंबई - ४०० ७०३.

**प्रत माहितीस्तव व आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी :**

१. शिक्षणाधिकारी (माध्य.), जिल्हा परिषद, ठाणे/पालघर/रायगड.

२. शिक्षण निरीक्षक, मुंबई दक्षिण/पश्चिम/उत्तर.

**प्रत-**

१. विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई.

२. सचिव, राज्य मंडळ, पुणे.